ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

*No: CGRF/AZ/AUR/ R / 258 / 2009 / 92/ Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Rural Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Baburao Vishwanathrao Khurud Post Vihamandwa, Tq.Paithan, Dist. Aurangabad. (Consumer No. 49370004291)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Baburao Vishwanathrao Khurud Post Vihamandwa,* Tq.Paithan, Dist. Aurangabad.

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 01.12.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

Copy to:-

*Shri Baburao Vishwanathrao Khurud*
*Post Vihamandwa, Tq.Paithan,*
*Dist. Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/२५८/२००९/९२**

**तक्रार दाखल दिनांक :- १९/११/२००९**
**निकाल दिनांक :- १८/०१/२०१०**

**श्री बाबुराव विश्वनाथ खुरुद,**
**मु.पोस्ट विहामांडवा, ता.पैठण,**
**ह.मु. बिडकीन, कल्याणनगर,**
**ता.पैठण,जि.औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९३७६०००४२९१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत ग्रामीण विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |
| | **वि. सु. काबरा** | **सदस्य** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १९/११/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण परिमंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०१/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) गाहकाने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक कंमाक ४९३७६०००४२९१ असा आहे. ग्राहकाचे वरील घरगुती कनेक्शन हे विहामांडवा या गावात असुन ग्राहक सद्या बिडकीन येथे राहत आहे. त्यामुळे ग्राहकाचा वीज वापर होत नसुन घर बंद असते महावितरण कंपनीने ग्राहकास सरासरी आकारणीचे वीज देयक दिलेले आहे.सरासरी आकारणीचे वीज देयक रद्द करुन रिडींग नुसार वीज बिल देण्यात यावे व कनेक्शन कायमचे बंद करण्यात यावे याबाबत ग्राहकाने दिनांक २५/१२/२००७ रोजी लेखी अर्ज केला परंतु त्यांच्या अर्जाची दखल न घेता कंपनीने सरासरी आकारणीची देयके सुरुच ठेवले त्यामुळे वीजेचा वापर नसतांनाही माहे आक्टोबर अखेर ग्राहकाकडे थकीत बाकी रुपये ३२०८.५५/- प्रलंबित झाली.वरील देयक दुरुस्त करुन कनेक्शन कायमचे बंद करण्यास महावितरण कंपनीस आदेश देण्याकरीता ग्राहकाने या मंचात तक्रार दाखल केली आहे.

२) दिनांक १९/११/२००९ झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी सहाय्यक अभियंता पैठण व वीज ग्राहक उपस्थित होते.ग्राहकाने वरील प्रमाणे तक्रार कथन केली. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाची तक्रार मान्यकरुन रिडींग नुसार वीज देयक करुन, ग्राहकाच्या विनंतीप्रमाणे विद्युत पुरवठा कायमचा बंद करण्यात येईल असे सांगीतले.मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाचे सी.पी.एल.व प्रस्तावीत वीज देयक दुरुस्ती अहवाल सादर करण्यास सांगुन सुणावणीची तारीख ०८/१२/२००९ देण्यात आली.

३) दिनांक ०८/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल. व सुधारीत वीज देयक रुपये ४८०/- मंचास सादर केले. त्यांनी केलेल्या निवेदनानुसार वीज ग्राहकाचे विनंती नुसार त्याचे कनेक्शन दिनांक ०२/१२/२००९ रोजी कायमचे बंद करण्यात आले असुन ग्राहकाकडे आज रुपये ४८०/- थकबाकी असल्याचे सांगीतले. वीज ग्राहकांने वरील थकबाकी मधुन त्यांनी भरलेली सुरक्षा ठेव वजा करण्याची विनंती केली. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवले.

४) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, वीज ग्राहकास मीटर रिडींग न घेता सरासरी वर आधारीत वीज देयके देण्यात आलीत.वरील कनेक्शनच्या ठिकाणी ग्राहक राहत नसल्यामुळे एकदा मीटर रिडींग घेवुन सुधारीत वीज देयक देण्याची,व कनेक्शन कायमचे बंद करण्याची विनंती लेखी अर्जाद्वारे दिनांक २५/१२/०७ रोजी महावितरण कंपनीस केली.परंतु त्यांचे तक्रारीची दखल न घेता सरासरी आकारणीची वीज देयके सुरुच ठेवण्यात आली व त्यावर व्याज व दंडाची आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येते.मंचाचे आदेशानुसार वरील सरासरी आकारणीचे देयक रद्द करुन ग्राहकाचे मीटर वाचना नुसार रुपये ४८०/-चे सुधारीत देयक तयार करण्यात आले. वरील देयक ग्राहकाच्या अर्जानुसार नोव्हेंबर २००७ पर्यंत आकारण्यात येऊन त्यानंतर कनेक्शन कायमचे बंद दाखविण्यात असल्याचे दिसुन येते. वरील देयक ग्राहकास संमजावुन सांगण्यात आले असुन त्यांनी ते मान्य केले आहे. ग्राहकाच्या सी.पी.एल.चे निरिक्षण केले असता रुपये ३०० अनामत रक्कम महावितरण कंपनीकडे भरली असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे थकीत बाकीच्या रकमेतुन अनामत रक्कमेची वजावट करुन बाकी राहीलेले देयक ग्राहकास भरण्यासाठी देणे योग्य होईल.

# आदेश

१) महावितरण कंपनीने वीज ग्राहकास रुपये ४८०/-चे देयकातुन अनामत रक्कम  वजा करुन (४८०-३००) =१८० रुपयाचे वीज देयक ग्राहकास द्यावे.

२) ग्राहकाचे कनेक्शन कायमचे बंद केल्यामुळे यापुढे त्यांना कोणतेही आकारणी करु नये.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/२५८/२००९/९२/ दिनांक :-

प्रति,
श्री बाबुराव विश्वनाथ खुरुद,
मु.पोस्ट विहामांडवा, ता.पैठण,
ह.मु. बिडकीन, कल्याणनगर,
ता.पैठण,जि.औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९३७६०००४२९१)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रामीण/**२५८/२००९/९२** )

आपण दिनांक १९/११/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.